# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६७ वी बैठक दि. १ जून २०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

१. मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर ... मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष
२. मा. इं. चं. स. मोडक ... सचिव (लाक्षेवि) व सदस्य
३. इं. दी. रं. कंदी ... कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**विशेष निमंत्रित**

१. मा. श्री. आनंदराव पाटील ... मा. उपाध्यक्ष

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

१. श्री. रा. मा. भुते, उप सचिव ... प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी
२. श्री. मधुकर स. कांबळे, अवर सचिव ... प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी
३. श्री. श्रीरंग वि. जाधव, उपसचिव ... प्रधान सचिव (कृषि) व सदस्य यांचे प्रतिनिधी
४. श्री. चंद्रकांत कृ. मोरे, कक्ष अधिकारी ... अप्पर मुख्य सचिव (म व पु) व सदस्य यांचे प्रतिनिधी

**निमंत्रित अधिकारी**

१. इं. शि. मा. उपासे ... मुख्य अभियंता (जसं), पुणे
२. इं. चं. आ. बिराजदार ... मुख्य अभियंता (विप्र), पुणे
३. श्री. अ.स. शिरुडे ... मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम)
४. श्री. अनिल कवडे ... उपायुक्त (पुनर्वसन), पुणे
५. इं. अविनाश सुर्वे .... अ.अ., पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे
६. इं. वि. मा. कुलकर्णी ... अ.अ. पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे
७. इं. दि. मा. सोनवलकर ... अ.अ. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली
८. श्री. व्हि. के. कांबळे ... अ.अ. यांत्रिकी मंडळ (द्वारे), पुणे

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

सही/-
**(इंजि. दीपक रं. कंदी)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

सही/-
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

**ठराव**

**ठराव क्र.६७/१**

**"नियामक मंडळाच्या ६५ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."**

---

**ठराव क्र.६७/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६६ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

---

**ठराव क्र. ६७/३**

**''ठराव करण्यांत येतो की, सन २००९-१० च्या चौदाव्या वार्षिक अहवालास मान्यता देणेत येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.**

---

**ठराव क्र. ६७/४**

**"ठराव करण्यात येतो की, विभागीय आयुक्त कार्यालयाने पुनर्वसन कामांसाठी कार्यालयीन सुविधा, वाहने आणि त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याविषयी केलेल्या मागणीनुसार दि.२५/०४/२०११ रोजी मा.मंत्री महोदय, पुनर्वसन व मदतकार्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या आढावा बैठकीत ठरल्याप्रमाणे संगणकीय कामकाजासाठी प्रकल्पनिहाय खर्ची टाकून एकूण १०८ प्रकल्पांसाठी प्रत्येकी ₹ ५ लक्ष प्रमाणे ₹ ५४० लक्ष व विभागीय आयुक्त कार्यालयासाठी ₹ १० लक्ष असे एकूण ₹ ५५० लक्ष टप्प्याटप्प्याने प्रदान करण्यास तसेच पुनर्वसन विभागाकडून वाहने उपलब्ध होईपर्यंत पुनर्वसन कामासाठी महामंडळाने प्रत्येक जिल्ह्यासाठी २ वाहने भाडेतत्वावर घेण्यासाठी दरमहा ₹ ३० हजार प्रतिवाहन याप्रमाणे रक्कम विभागीय आयुक्त कार्यालयास प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच यासाठी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे व विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मान्यतेने पुनर्वसनाचा कालबद्ध कार्यक्रम तयार करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. तसेच प्रकल्पाच्या पुनर्वसन विषयक कामासाठी मदत व पुनर्वसन विभागाने विभागीय आयुक्त/महसूल यंत्रणेने संपूर्ण सहकार्य करुन तत्परतेने कार्यवाही करावी."**

---

**ठराव क्र. ६७/५**

**''ठराव करण्यात येतो की, निरा देवघर उजवा कालवा कि.मी.१६ च्या संरेखेवरील सौ.विमल नाना खोपडे यांच्या नावावर असलेले गट क्र.२४ मधील ग्रामपंचायत मिळकत क्र.१११/५६ येथील घराच्या**

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(इंजि. दीपक रं. कंदी)** | **(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)** |
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

नुकसान भरपाई पोटी ₹ १,३४,६८८/-इतकी मोबदला रक्कम (घसारा वजा जाता निव्वळ देय रक्कम) त्यांना अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''

---

**ठराव क्र. ६७/६**

"प्रकल्पग्रस्तांसाठी अपवादात्मक प्रकरण (Exceptional case) म्हणून बुध्दीहाळ मध्यम प्रकल्पातील गाळपेर जमीनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मौजे गौडेवाडी सहकारी सामुदायिक संस्था मर्यादित गौडेवाडी यांना २१०.२० एकर व सोमेवाडी सहकारी सामुदायिक संस्था सोमेवाडी यांना ३६३.१० एकर अशी एकूण ५७३.३० एकर (२३२ हेक्टर) जमीन कसण्यासाठी ₹ १००/- प्रतिवर्षे/प्रति हेक्टर दिनांक ९/१२/२००९ च्या पुढे ११ महिने मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाच्या दिनांक १३-०४-२०१० रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.६४/०५ अन्वये ठराव पारित करण्यात आला आहे. सदरच्या भाडेकराराची मुदत दिनांक ९-११-२०१० रोजी संपली असल्याने त्यामुळे आता असा ठराव करण्यांत येतो की, सदर जमिन त्याच भाडेपट्टा कराराने दिनांक ९-११-२०१० च्या पुढे ११ महिने मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे." सदर जमीन १२ वर्षे मुदतीने भाडेपट्टयाने देण्याबाबत "खास बाब" प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

---

**ठराव क्र. ६७/७**

"ठराव करण्यात येतो की, म्हैसाळ योजनेच्या सुमारे ₹ २.५९ कोटी थकीत वीज देयकापैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने (M.S.E.D.C.) ₹ ८७.७७ लक्ष भरल्यानंतर वीज जोडणी करुन देण्याचे मान्य केल्याने त्यापैकी ₹ ७० लक्ष रक्कम महामंडळामार्फत आगावू भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

अटी -

(१) लाभार्थी शेतकऱ्यांकडून मागणी नमुना अर्ज-७ भरुन, त्यातील अट क्र.१३ स्पष्टपणे विशद करावी. त्यासाठी जाहीर प्रकटन काढण्याची कार्यवाही त्वरेने करावी.

(२) वीज जोडणीसाठी महामंडळाकडून आगावू रक्कम भरली जात असल्याने त्या रकमेची लाभार्थीकडून वसुली करण्याची दक्षता घ्यावी."

---

**ठराव क्र. ६७/८ :**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कृषी संजीवनी योजनेचा लाभ मिळण्यासाठी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या डिसेंबर-२०१० अखेर प्रलंबित असलेल्या

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. दीपक रं. कंदी) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

### नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

विद्युत देयकांची रक्कम ₹ ११९२.२५ लक्ष प्रकल्पावर "पी-मेंटनन्स" या उपशीर्षांतर्गत खर्ची टाकून उपलब्ध निधीतून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना अदा करणेस नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच योजनेची जानेवारी २०११ ते डिसेंबर २०११ पर्यंतच्या विद्युत देयकांची अदायगी विहीत कालावधीत होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार सदर देयके प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून व "पी-मेंटनन्स" या उपशीर्षांतर्गत खर्ची टाकून अदा करण्यास नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे."

---

**ठराव क्र. ६७/९**

"ठराव करण्यात येतो की, खटाव तालुक्यातील टंचाई सदृश परिस्थितीमध्ये उरमोडी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करुन पिण्यासाठी व जनावरांसाठी सोडणेत आलेल्या पाण्याच्या आवर्तनासाठी आवश्यक ₹ २१.२५ लक्ष इतकी रक्कम उरमोडी प्रकल्पाच्या उपलब्ध असलेल्या निधीतून खास बाब म्हणून खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

---

**ठराव क्र. ६७/१०**

"ठराव करण्यात येतो की, ताकारी कालवा किमी. १०६ ते १३० मधील वितरिकांची कामे तासगाव पलूस तालुका सहकारी साखर कारखाना लि., तुरुची, जि. सांगली यांचेमार्फत स्वबळावर करण्याचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

**ठराव क्र. ६७/११**

"ठराव करण्यात येतो की, टेंभू प्रकल्पांतर्गत सांगोला तालुक्यातील  सांगोला कालव्याच्या वितरिकांची कामे सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाकी (शिवणे) यांचेमार्फत स्वबळावर करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

**ठराव क्र. ६७/१२ :**

पानशेत, ता. वेल्हे, जि. पुणे येथे जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा मिळणेबाबतचा विषय मागे घेण्यात आल्यामुळे याबाबत कोणताही ठराव करण्यात आला नाही.

---

**"मान्य"**

सही/-
(इंजि. दीपक रं. कंदी)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

**ठराव क्र. ६७/१३**

**" ठराव करण्यात येतो की, ट्रायकॉम ॲग्रोकेम लि. अंदोरी, ता. खंडाळा या संस्थेस वीर जलाशयातून घरगुती व औद्योगिक कारणासाठी कायमस्वरुपी पाणी परवानगी दिली असल्याने या संस्थेस पाणी उचलण्यासाठी योजना कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने वीज जोड पॅनेल बॉक्स व उदंचन विहिरीसाठी जागा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. यास्तव संस्थेस आवश्यक असणारी मौ. भादे हद्दीतील स.नं. ७९ मधील २१४ चौ.मी. जागा महामंडळाच्या प्रचलित दरानुसार अथवा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रचलित प्राईम लेंडिंग रेटने (जे जास्त असेल ते) ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. दरवर्षी भाडेपट्यामध्ये मूळ भाडेपट्टयाच्या १० टक्के एवढी भाडेवाढ करण्यात यावी व संस्थेने प्रत्येक वर्षी स्वतंत्र करारनाम्याद्वारे भाडेपट्टयास मुदतवाढ घ्यावी."**

---

ठराव क्र. ६७/१४

''ठराव करण्यात येतो की, मौजे डिंभे खुर्द येथील डिंभे धरणाचे बांधकामासाठी डबर खाणीकरिता संपादित केलेल्या सर्वे नं.२५/४ व ५ मधील अनुक्रमे ३१ आर व २८ आर पैकी १२ आर जागा अतिरिक्त असून, भविष्यात जलसंपदा विभागास लागणार नसल्याने व सदर जागेचा वापर सार्वजनिक हितास्तव होणार असल्याने कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, (उत्तर) विभाग, पुणे यांना डिंभे, ता.आंबेगाव येथे सांस्कृतिकभवन बांधणेसाठी सदरच्या अतिरिक्त असलेल्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.''

---

ठराव क्र. ६७/१५:

**"ठराव करण्यात येतो की, पारगाव सुद्रिक, ता. श्रीगोंदा येथील कुकडी वसाहतीमधील २००० चौ. फूट जागा विनावापर जागा (इमारती मधील अथवा मोकळी) राजर्षी शाहू महाराज विद्यार्थी वसतीगृह पारगांव, ता. श्रीगोंदा यांना महामंडळाच्या प्रचलित दराने अथवा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रचलित प्राईम लेंडिंग रेटने (जे जास्त असेल ते) ११ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

ठराव क्र. ६७/१६

**"ठराव करण्यात येतो की, कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली येथील पाटबंधारे वसाहतीमधील इमारत क्र. २०/४ व २०/५ वसतीगृहासाठी कायम स्वरुपी मिळणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. सदर जागा ११ महिन्यांच्या कराराने पुर्वीच्याच अटी व शर्तीवर भाडेपट्टयाने देण्यात यावी."**

**"मान्य"**

सही/-
(इंजि. दीपक रं. कंदी)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

### नियामक मंडळाची ६७ वी बैठक दिनांक १ जून २०११

---

**ठराव क्र. ६७/१७**

**"ठराव करण्यात येतो की, म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. १ ते ५ येथील पंपांची देखभाल दुरुस्तीसाठी ₹. ४३.८५ कोटी निधी शासन अंशदानातून प्रत्यक्षात उपलब्ध झाल्यानंतर ही कामे हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

**मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय**

**ठराव क्र.६७/१८**

**"ठराव करण्यात येतो की, उजनी प्रकल्पाच्या जलाशयासाठी मौजे खानोटा, ता.दौण्ड, जि.पुणे येथील संपादित जमिनीवरील घरे, विहीरी, पाईपलाईन इत्यादींचा सानुग्रह अनुदान प्रस्तावास महसूल विभागाच्या मंजुरीच्या अधीन राहून संबंधित बाधित खातेदारांना अनुज्ञेय मोबदला रक्कम (दि.०५/०६/२०११ पर्यंतच्या व्याजासह) ₹ ३३.८८ लक्ष (रुपये तेहतीस लक्ष अठ्ठ्याऐशी हजार फक्त) अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

सही/-
**(इंजि. दीपक रं. कंदी)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

सही/-
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**